099002




99002

(11)

पुणे मराठी ग्रंथालय

४३७ ब, नारायण पेठ, पुणे ३०

पुस्तकाचे नाव भारतीय नारी

लेखक साने गुरुजी

—साने गुरुजी

साधना
साप्ताहिक

संस्थापक : साने गुरुजी

- शाळा-महाशाळांतील विद्यार्थी, सार्वजनिक वाचनालये आणि सुसंस्कृत अभ्यासू नागरिक यांच्यासाठी उपयुक्त असे साप्ताहिक.
- साने गुरुजी पहिल्या निवेदनात म्हणतात : "महाराष्ट्रात उदार विचार सर्वत्र नेण्यासाठी साधना आहे. समाजवादी तिची दृष्टी आहे. जेथे जेथे चांगला विचार दिसतो तेथून साधना घेते. नवयुगाला अनुरूप अशी विचारसंपदा देणारी साधना आहे."
- प्रचलित जागतिक घडामोडींची सर्वांगीण माहिती.
- विधायक कार्याचा परिचय.
- थोर व्यक्तींचे परिचय.
- समाजा... ...ज्ञात अ... ...ंची ओळख.
- आंतर ...

...व्य. विविध धडपड.

... आंदोलने.

- मुलांच्या ... ...पात इ. इ.

वार्षिक वर्गणी १८ रुपये

सहामाही वर्गणी १० रुपये

४३०-३१ शनिवार पेठ, पुणे २

# भारतीय नारी

साने गुरुजी

किंमत ६० पैसे

साधना प्रकाशन, पुणे
४३०–३१ शनिवार, पेठ, पुणे २

## अनुक्रम

**वेदकाल** स्वतंत्र वृत्तीच्या, स्वाश्रयी, कष्ट करणाऱ्या ज्ञानी अशा प्राचीन भारतीय नारीचे दर्शन.

**वेदोत्तरकाल** या कालात स्त्रियांना गौणत्व आले. 'स्त्रियो वैश्यास्तथा शूद्राः' अशी गणना होऊ लागली. मुलगी म्हणजे बापाचे हृदय विदीर्ण करणारी, असे समाज मानू लागला.

**इस्लामच्या आगमनानंतर** इस्लाम आल्यानंतरची उत्तरेतील व दक्षिणेतील स्थिती येथे पहावयाला मिळेल. समर्थांच्या काळातील महाराष्ट्रातील स्त्री-जीवनाचे दर्शन येथे होईल, गुजराती भगिनी दिसतील.

**इंग्रजी अमदानी** आता ही इंग्रजी अमदानीतली दृश्ये. ज्योतिबा फुले, आगरकर यांच्या काळातील भारतीय नारी येथे आहे.

**स्वातंत्र्याचा उषःकाल** शिक्षण वाढू वागले. सेवासदने, सूतिकागृहे इत्यादी संस्था निघू लागल्या. परंतु देशाची अजून दृष्टी नव्हती. स्वदेशी व्रताचा गंध नव्हता. महात्माजींची चळवळ आली. स्त्रियांचा आत्मा जागा झाला. २०, ३० - ३२, ४२ इत्यादी साली स्त्रियांनी अपार त्याग केला. भारतीय नववारी उभी राहिली.

---

द्वितीयावृत्ती सप्टेंबर—१९६२

तृतीयावृत्ती जानेवारी—१९६७

© साधना ट्रस्ट

प्रकाशक : प्रभाकर सिद्ध, साधना प्रकाशन, ४३०–३१ शनवार पेठ, पुणे २.

मुद्रक : मा. ह. पटवर्धन, संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २.

# वेदकाल

आपला देश स्वतंत्र झाला आहे. सर्वांच्या विकासाला आता वाव हवा. कोणाचा कोंडमारा नको. आत्म्याची अनंत शक्ती सर्व क्षेत्रांत सर्वांनी प्रकट करावी. स्त्रियांनीही केवळ संसारातच रमू नये. संसार तर नेटका करावाच. परंतु स्वतःचा संसार राष्ट्राच्या संसारासही जोडावा. अलग असणे म्हणजे माया. सर्वांशी मिळून असणे म्हणजे सत्य. हेच ब्रह्मज्ञान. भारतीय नारींनी हे लक्षात ठेवावे.

आज स्वतंत्र भारतात सात्त्विक अभिमानाने उभे असताना मला शेकडो शतकांतील भारतीय नारींचा इतिहास दिसत आहे. भारतीय इतिहासात तुम्हीही भर घातली आहे. भारतीय संस्कृती तुम्ही वाढवली, सांभाळली. तुमच्या इतिहासाचा धावता चित्रपट दाखवू ? या माझ्या बरोबर.

तो बघा वेदकाळ. पाचसात हजार वर्षांपूर्वीचा काळ. आर्य आणि नाग यांच्या संमिश्रणाचा काळ. आर्य आणि एतद्देशीय यांच्या संघर्षाचा नि संग्रामाचा काळ. तो मोकळा काळ होता. स्त्रिया श्रम-जीवनात रमत. त्या दळीत, कांडीत,विणीत, वयन्ती म्हणजे विणणारी, हा शब्द वेदात येतो. घरांत हातमागावर का तुम्ही विणीत होता ? तुम्ही श्रमानें मिळवीत होता म्हणून स्वतंत्रही होता. त्या वेळेस प्रेम-विवाह होते. ‘ उषेपाठोपाठ हा सूर्य तिची प्रेमाराधना करीत जात आहे, जसा पुरुष स्त्रीच्या पाठोपाठ जातो ’ असे वर्णन येते. एक प्रियकर रात्री प्रियेच्या घराजवळ येतो. कुत्रा भंकू लागतो. ‘ अरे कुत्र्या, नको भुंकू ’ असे तो प्रार्थितो. त्या काळात वैवाहिक नीती आली ?

यमयमी संवादात बहीणभावांच्या लग्नाचा उल्लेख आहे. यमी

यमाला म्हणते : “ पूर्वी तशी प्रथा असेल, परंतु आता नाही. ” म्हणजे नवीन नियम आले. “सप्तमर्यादा कवयस्ततक्षुः” सात मर्यादा शहाण्या लोकांनी घातल्या, असे वेद सांगतो. वेदातील स्त्रिया सुशिक्षित असत. त्यांनी सूक्ते रचिली आहेत. वेदात त्यांचा अंतर्भाव आहे. विवाह प्रौढपणी होत. कारण विवासूक्तातील मंत्र म्हणतात : “ मुली, तू आता घराची स्वामिनी. सासूसासऱ्यांना विश्रांती दे. ” स्त्रीला प्रतिष्ठा होती. विवाहसूक्तांत सुंदर उपमा वधूवरांस दिलेल्या आहेत. वर ऋग्वेद तर वधू सामवेद. हा सामवेद म्हणजे संगीताचा वेद. संसारात संगीत आणणारी अशी ही नववधू आहे. स्त्री म्हणजे व्यवस्था, स्वच्छता, सुंदरता. वराला आकाश म्हटले तर वधूला पृथ्वी म्हटले. पृथ्वीप्रमाणे ती क्षमाशील. असा तुम्हा नारींचा वेदकालीन महिमा आहे. पुरुष द्यूत खेळणारा, दारू पिणारा. ती सारे सहन करते. कधी त्याची कानउघाडणीही करते. वेदातील एक द्यूत खेळणारा म्हणतो : “ सर्वत्र अपमान, घरी बायकोही बोलते.” स्वतंत्र वृत्तीची, स्वश्रयी, कष्ट करणारी, ज्ञानी, अशी ही प्राचीन भारतीय स्त्री दिसते.

* * *

# वेदोत्तरकाल

वेदकालामध्ये भारतीय स्त्रियांची प्रतिष्ठा दिसते. उपनिषदातही त्यांचा महिमा आहे. याज्ञवल्क्य आपली मालमत्ता उभय पत्नींना देऊन वनात जायला निघतो. तर त्याची एक पत्नी त्याला म्हणते : "ही संपत्ती जर त्याज्य असेल, तर ती मला तरी काय करायची ? जे सुख तुम्ही जोडू इच्छिता. तेच मलाही हवे आहे." स्त्रिया तत्त्वज्ञानाच्या चर्चा करतात. राजदरबारात वाद करतात. केवढे भव्य हे दृश्य. परंतु स्त्रियांचा महिमा हळूहळू कमी होत आला असावा. गीता 'स्त्रियोवैश्यास्तथा शूद्राः' असा उल्लेख करते. म्हणजे स्त्रियांना स्वतंत्रपणे मोक्ष मिळणे अशक्य, अशी का भावना होऊ लागली होती ! स्त्रिया म्हणजे का पापयोनी ?

जी स्त्री सर्व संसाराची आधार, ती तुच्छ का ? रामायण, महाभारतकाळी स्त्रियांचे स्वयंवर होत असे. स्वतःला पती शोधायला सावित्री जाते. त्या प्रौढ असत. स्त्रियांचे मौंजीबंधनही होई. त्या गुरुगृही शिकायला राहत. सीता गोदावरीच्या तीरी संध्या करी, असे रामायणात वर्णन आहे. म्हणजे वेदविद्येचा त्यांना अधिकार होता. 'ब्रह्मवादिनी' अशी विशेषणे सीता, द्रौपदी यांना लावलेली आढळतात. रामाच्या मुद्रिकेवरचे नाव सीता वाचते. स्त्रिया राजकारणातही लक्ष घालीत. त्यांना युद्धकलेचेही शिक्षण असे. दशरथाबरोबर कैकयी रणांगणात जाते. सत्यभामा नरकासुराला मारते. सुभद्रा रथ उत्तम तऱ्हेने हाकी. क्षत्रियकन्यांना हे सारे शिक्षण मिळत असे का ? इतर कलांचेही शिक्षण त्यांना मिळे. उत्तरेला नृत्य शिकवायला अर्जुन राहतो. चित्रकलाही शिकत. उषा अनिरुद्धाला स्वप्नात पाहते. तिची मैत्रीण चित्रलेखा तिला जगातील सर्व तरुणांची चित्रे काढून दाखवते. तिने नावच चित्रलेखा. क्षत्रिय

मुलींना हे सारे सांस्कृतिक शिक्षण मिळत असेल. ब्राह्मण कन्या काय करीत ? त्याही गुरुगृही शिकत. गुरुगृही या त्या मुलींना अनुरूप शिक्षण मिळत असावे. महाभारतात उद्योगपर्वात एक तपस्विनी म्हणते : “ मी सत्तर वर्षांची होऊन गेले. अनेक आश्रमांतून राहिले, ज्ञान मिळविले. ” सत्तर वर्षे ती अविवाहित होती. सत्तरी ओलांडल्यावर ती चिरयुवती विवाह करू इच्छिते. स्त्रियाही का वाटेल तितके शिकत, इच्छेनुरूप विवाह करीत ?

परंतु हे काही असले तरी त्यांचे सामाजिक स्थान कमीच मानले जाऊ लागले. धर्मराजा द्रौपदीसही पणास लावतो, याचा अर्थ काय ? परंतु तो आपल्या भावांनाही पणास लावतो. कुटुंबाचा मुख्य असल्यामुळे त्याची का सर्वांवर सत्ता ? खरा प्रश्न असा होता की, धर्माने स्वत:ला आधी पणाला लावले होते. स्वत: गुलाम बनल्यावर पत्नीला त्याला पुन्हा पणास लावता येत होते का ? पत्नीला स्वतंत्र अस्तित्व आहे की नाही ? परंतु ‘ धर्मस्य सूक्ष्मा गति : ’ असे म्हणून भीष्मद्रोणही मुके बसतात. पतीच्या जीवनाहून पत्नीला निराळे जणू अस्तित्व नाही. पतीच्या हाताला हात लागल्याने मोक्ष मिळेल. तिला स्वतंत्र मोक्षाचा कुठला अधिकार ? म्हणून का गीतेचे बंड ? ज्याप्रमाणे वैश्य, शूद्र यांना कमीपणा आला, त्याप्रमाणे स्त्रियांनाही. ज्यांनी स्वयंपाक करावा, दळावे, कांडावे, शेण लावावे. त्यांना कोठला मोठेपणा ? परंतु राजसूय यज्ञात उष्टी काढण्याचे कर्म स्वीकारून श्रीकृष्णाने स्त्रियांची प्रतिष्ठा स्थापिली. परंतु स्त्रियांची प्रतिष्ठा वाढली नाही. त्यांना स्वतंत्र किंमत राहिली नाही.

कालिदास,भवभूती यांच्या नाटकांतून स्त्रियांची स्थिती बरी दिसते शाकुंतलात कण्वाच्या आश्रमात मुलांबरोबर मुलीही शिकत आहेत. असे दृश्य आहे. उत्तररामचरितात लवकुशांबरोबर भराभर शिकता येत नाही, म्हणून एक तापसी दुसऱ्या आश्रमात जाते. परंतु हे

उल्लेख त्या त्या कविवरांच्या काळाला धरून होते, की प्राचीन काळाचे ते चित्र त्यांनी रंगविले होते हे कळत नाही.

स्मृतिग्रंथ पाहिले तर निराळे प्रकार दिसू लागतात. प्रौढविवाह लोपले असे दिसते. बालविवाहाची प्रथा रूढ झाली. मग कोठले शिक्षण नि काय ? पती हाच गुरू. त्याने शिकवावे. स्त्रियांना स्वातंत्र्य दिसत नाही. हा फरक का आला, कसा आला ? हा का बुद्धधर्माचा परिणाम होता ? बुद्धधर्म स्त्री-पुरुषांना कमी लेखीना. पुरुषांप्रमाणेच स्त्रियाही दीक्षा घेत. त्या भिक्षुणी बनत. धर्मप्रचार करीत. परंतु यातून पुढे अनाचार माजला का ? ब्रह्मविहार हे कामविहार झाले की काय ? म्हणून का निराळी लाट आली ? वैदिक कर्मकांडाने पुन्हा उचल खाल्ली तेव्हा का लहानपणीच विवाह करावे असे ठरले ? काही असो. स्त्रियांच्या जीवनातील मोकळेपणा गेला.

स्त्रीला स्वातंत्र्य योग्य नव्हे, असा जणू दंडक झाला. ती अबला बनली. लहानपणी पिता रक्षक, पुढे पती रक्षक, वृद्धावस्थेत पुत्र रक्षक. ती एक रक्षणार्ह वस्तू बनली. आणि जिचे रक्षण करायला दुसरे लागतात, तिला स्वतःची काय किंमत ? स्त्री म्हणजे जणू एक इस्टेट, मालमत्ता, एक चीज, तिचा आत्मा कुठे उरला ?

' यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः '

जेथे स्त्रियांची प्रतिष्ठा ठेवण्यात येते तेथे देवता रमतात, असे जरी स्मृतीतून उल्लेख असले तरी ते फार मोठी मजल मारताहेत असे नाही. स्त्रियांची पूजा म्हणजे त्यांचे स्वातंत्र्य नव्हे. त्यांना नीट वस्त्र द्यावे, दागदागिना द्यावा, त्यांना संतुष्ट ठेवावे, असे स्मृती सांगते. थोडक्यात स्त्रिया म्हणजे बाहुल्या. खायला-प्यायला ल्यायला मिळाले की कृतार्थता मानणाऱ्या. स्त्रियांना का याहून थोर आनंद नको होते ? वैचारिक आनंद, ज्ञानाचा आनंद तो का त्यांना नको होता ?

‘दारिका हृदयदारिका पितुः’ मुलगी म्हणजे पाप, तिच्या लग्नाची चिंता, असे वातावरण दिसू लागते. यास्कांचे निरुक्त जवळजवळ अडीच हजार वर्षांपूर्वीचे. परंतु त्यातही दारिका म्हणजे पित्याचे हृदय विदीर्ण करणारी, अशी व्युत्पत्ती लावलेली. दारिका म्हणजे मुलगी. यास्काचार्यांनी या शब्दाचे अनेक धात्वर्थ दिले आहेत. परंतु हाही दिला आहे. अजूनही तीच स्थिती आहे. मुलीचे लग्न कसे करावयाचे, हीच चिंता आज हजारो वर्षे भारतात आहे. मुलाप्रमाणे मुलगी मोकळेपणाने वाढली नाही, शिकली नाही. तिला विवाह करण्याचे वा न करण्याचे स्वातंत्र्य नाही, अशी ही स्थिती दिसू लागते.

असे स्थित्यन्तर व्हायला काय कारण? लहानपणीच लग्न लावले तर मुलगी सासरी जाऊयेऊ लागते. लहानपणी झाड उपटून दुसरीकडे लावले तर नीट जगते. मोठेपणी ते नीट मुळे धरू शकत नाही. त्या वेळेस एकत्र कुटुंबपद्धती होती. ती नांदवण्यासाठी का हा प्रयोग सुरू झाला? सासरच्या मंडळीबद्दल, तेथील दीर, नणंदा, भावजया यांच्याबद्दल लहानपणापासून परिचयामुळे प्रेम वाटेल, असे का प्रयोग करणाऱ्यांस वाटू लागले! ते काही असो अशी पद्धत सुरू झाली खरी.

पुराण-कीर्तन-श्रवण हेच ज्ञानाचे साधन राहिले. वेदांचा अधिकारच गेला. प्रत्यक्ष शिक्षण संपले. अप्रत्यक्ष ज्ञान कळेल तेवढेच. अपवाद म्हणून स्त्रिया पंडित होत असतील. शंकराचार्य व मंडनमिश्र यांच्या वादविवादाच्या वेळेस मंडनमिश्रांची पत्नी अध्यक्ष असते. तिला का मंडनमिश्रांनी शिकविले होते? काही घराण्यातून ज्ञानोपासना सुरू असेल.

कालिदासाची पत्नी शिकलेली होती. परंतु तो अज्ञानी होता. शरमेने तो निघून गेला. त्याने उपासना केली. ज्ञान मिळवून घरी

परत आला. त्याने दार ठोठावले. ‘कोऽस्ति ? – कोण आहे’ असा पत्नीने आतून प्रश्न केला. “अस्ति कश्चित् वाग्विलासः” वाग्-देवतेजवळ क्रीडा करणारा आहे कोणीतरी, असे त्याने उत्तर दिले. आणि पुढे या चार शब्दांतील एकेक घेऊन त्याने चार काव्यांचा आरंभ केला, अशी दन्तकथा आहे.

संस्कृत भाषा स्त्रियांना समजे, परंतु बोलता येत नसे. कारण शिक्षणच बंद झाले. वेदांमध्ये स्त्रियांनी संस्कृतमध्ये मंत्र लिहिले. उपनिषदांतून त्या चर्चा करताना दिसतात. परंतु संस्कृत नाटकांतून स्त्रिया संस्कृत न बोलता प्राकृत बोलतात. संस्कृत ही वरिष्ठांची भाषा राहिली. जे शिकत त्यांची भाषा. वैश्य, शूद्र, स्त्रिया यांना संस्कृत शिक्षणच मिळेनासे झाले.

सर्व बाजूंनी आत्म्याचा हा असा कोंडमारा होत होता. पातिव्रत्याचे स्तोम माजले. सती जाण्याची चाल पडली. पुरुषाने अनेक विवाह केले तरी परवानगी. एवढेच नव्हे तर त्याने पत्नी वारल्यावर लौकरच पुन्हा विवाह करावा म्हणून धर्माज्ञा. आणि स्त्रीने काय करावे ? तिला का भुका नाहीत ? परंतु तिने व्रतस्थ जीवन कंठायचे. ती संसारातील संन्यासिनी. तिने सारे काम करायचे. ती सोज्वला, सोवळी. तिने इतरांची बाळंतपणे करावी, आजाऱ्यांची सेवा करावी, स्वयंपाक करावा, लहान मुलेबाळे घरात असतील त्यांना सांभाळावे. मुलाबाळांची हौस तिने देवाला मूल मानून भागवून घ्यावी. तो बाळकृष्ण. त्याला ती कुंची घालील, साखळी घालील. तो तिचा मुलगा. देवाची ती आई होते. वरिष्ठ वर्गांतून तरी स्त्रियांना असे हे प्रखर वैराग्य शिकवण्यात आले. ती परंपराच पडली.

* * *

# इस्लामच्या आगमनानंतर

वेदकालीन नि उपनिषदकालीन स्त्री मागे पडली. मोकळेपणा गेला. ते प्रौढविवाह गेले. ज्ञानार्जनाची सवलत गेली. विवाह रूढ झाले. पती हाच गुरू झाला. तोच देव. त्याच्या हाताला हात लावला की सारे झाले. स्त्रियांचे स्वातंत्र्य अस्तित्वच जणू लोपले. पती निवर्तला तर आमरण व्रतस्थ राहावयाचे. मग ती बालविधवा का असेना. तिला सन्यासिनी, व्रतस्थ करण्यात आले. केशवपनासारख्या चाली रूढ झाल्या. मारून मुटकून वैराग्य देण्यात येऊ लागले. तिच्या मनात वासना येऊ नयेत, सुखाची इच्छा उत्पन्न होऊ नये म्हणून तिने सत्कारसमारंभास जायचे नाही. ती जणू अशुभ! तिचे पांढरे कपाळ कसे पहावयाचे? ती सर्वांची सेवा करी नि सर्वांचे शिव्याशाप घेई. पुढे वृद्धपणी तिला कोणी मान दिला तर दिला. प्रतिष्ठित वर्गात तरी असा हा प्रकार सुरू झाला. गरीब, श्रमणाऱ्या जातीत मोकळेपणा असे. त्यांच्यात पुनर्विवाह असे. परंतु ज्या जाती स्वतःला श्रेष्ठ मानीत, त्यांच्यात स्त्रियांची अधिक कुचंबणा.

याच सुमारास इस्लामही इकडे आला. इस्लमी धर्मांच्या आक्रमणामुळे म्हणा किंवा त्यांच्यात पडद्याची चाल असे म्हणून म्हणा, उत्तर हिंदुस्थानात पडदा आला. खानदानी घराण्यातील स्त्रिया मोकळेपणी जातयेतनाशा झाल्या. मेण्यातून जायच्यायायच्या. घरी कधी इतरांना त्यांचे दर्शन व्हायचे नाही. "ज्यांच्या पायांचे नख सूर्याला कधी दिसले नाही" असे गौरवाने वर्णन करण्यात येऊ लागले. उत्तर हिंदुस्थानभर ही पडद्याची चाल आली. राजपुतांत प्रथमपासूनच होती की मुसलमानामुळे आली? रजपूत स्त्रिया शूर म्हणून प्रसिद्ध. मोठमोठ्या घराण्यातील स्त्रिया घोड्यावर बसायला शिकत. तलवार चालवायला शिकत. परंतु संकटकाली

त्या लढाईला नसत बाहेर पडत. त्या जोहार करीत. शेकडो स्त्रिया आगीत उड्या घेत. पुरुष रणांगणी धारार्थी पडत. रजपुतांत चालच होती की, मुलगा जन्मला म्हणजे त्याल तरवार दाखवायची, मुलगी जन्मली म्हणजे तिला दिवा दाखवायचा. पुरुषाने तरवार हाती घेऊन मरावे, स्त्रीने आगीत जळावे, हा त्या प्रतीकांचा अर्थ.

उत्तर हिंदुस्थानात मध्ययुगात किंवा नंतर कोणी प्रसिद्ध स्त्रिया आढळत नाहीत. मुसलमानी अमदानीत रेझिया व नूरजहान व चांदबीबी हीच नावे येतात. रेझिया दरबारात बसे, राज्य चालवी. ती जणू बंडखोर होती. मुसलमानी धर्म काही स्त्रियांना पडद्यात बसा नाही सांगत. काबाला प्रदक्षिणा घालताना स्त्रियांनी तोंडावर जरा पदर ओढून घ्यावा, एवढेच पैगंबराचे सांगणे.

महंमदांच्या काही पत्न्या प्रवचने करीत. स्त्रीला वारसा हक्क देणारे पैगंबर स्त्रीला कमी मानीत नसत. पुरुष काय, स्त्री काय, एकाच मातीतून आलात, ते म्हणत. अरबस्तानात लहान मुलींना वाळूत जिवंत पुरून मारीत. आईबापांना मुलींना सांभाळणे कठिण जाई. कशाला मुलगी जन्मली, असे म्हणत. परंतु पैगंबरांनी या गोष्टीला आळा घातला. कुराणात पुनःपुन्हा मुलींना नीट वागवा, असे उल्लेख आहेत. परंतु इस्लाममध्ये पडदा आला खरा. केमाल-पाशाने तुर्कस्थानातून तो दवडला परंतु इतर मुस्लिम राष्ट्रांतून तो अजून आहे. हिंदुस्थानातही आहे. मुस्लिम संस्कृतीने हिंदु संस्कृती-सही हा बुरखा बहाल केला. पडदा म्हणजे प्रतिष्ठितपणाचे लक्षण ! गरिबांना पडदा घेऊन कसे चालेल ? त्यांना तर कामाला जायला हवे. गरिबांत मोकळेपणा राहिला. ही दळभद्री चाल श्रीमंतांत, नबाबांत, राजेरजवाड्यांत राहिली.

सरदारकन्यांची, राजेरजवाड्यांच्या मुलांची लग्ने पुष्कळदा राजकीय हेतूने होत. या लग्नांवरून कधी युद्धेही होत. मुलगी

म्हणजे जणू स्वातंत्र्यहीन वस्तू. देण्याघेण्याची चीज. खरोखर या अशा लग्नाची चीड येते. त्यातून दुःखद घटनाही घडत. मीराबाई, कृष्णाकुमारी यांच्या कथा माहीत आहेत. परंतु शेकडो अज्ञात कथा असतील. बड्या लोकांचे हे प्रकार, तर सामान्य जनतेतही निराळ्या रीतीने तेच प्रकार होते. एक तर बालविवाह सर्रास रूढ झाले आणि स्त्रियांना व्यक्तिमत्त्व असे उरलेच नाही.

परंतु उत्तरेतील पडदा दक्षिणेत आला नाही. गुजरातमध्येही पडदा नाही. इकडे अधिक मोकळेपणा राहिला. मद्रासच्या बाजूला तर अधिकच स्वातंत्र्य. मलबारकडे तर स्त्रियांना अधिक मान. त्या मोकळेपणाने हिंडतील, फिरतील. तळ्यावर स्नानास जातील. मुक्त स्नान करतील. परंतु असा हा मोकळेपणा असला तरी लग्ने लहानपणीच होत. ज्ञानप्राप्तीला संधी नाही, वाव नाही. क्वचित् भिन्नजातीय विवाहही होत. परंतु अपवादात्मकच. ब्राह्मण आणि क्षत्रिय यांशी क्वचित् कधी लग्ने झाल्याची उदाहरणे आहेत. दक्षिणेकडे अगदी बालविवाह होत नसावेत, असे वाटते. परंतु मुलीच्या लग्नाला अडचणी फार. तिकडे मुलीचे लग्न करताना दागदागिने देण्याची पद्धत. कानांत निदान हिऱ्यामोत्यांची कुडी तरी आईबापांनी द्यायलाच हवीत. महाराष्ट्रातही मोकळेपणा होता. ज्ञानेश्वराबरोबर त्याची बहीण मुक्ताबाई ही मुक्तपणे हिंडते. ती व्रती असते. बालब्रह्मचारिणी असते. तिचा छळ झाला नाही. तिला नाव ठेवल्याचे माहीत नाही. संन्याशाची मुले म्हणून सामान्यतः त्यांच्यावर बहिष्कार असे एवढेच.

खेड्यापाड्यातून स्त्रिया मोकळेपणे वावरत. शेतात कामाला जात. सणावारी यात्रेला जात. नागपंचमी आली तर झाडाला झोका बांधून स्त्रियाही झोका घेत. संक्रान्तीच्या दिवशी काही ठिकाणी या गावच्या त्या गावच्या स्त्रिया सीमेवर जमायच्या नि उखाळ्या-

पाखाळ्या काढून गमतीने भांडायच्या. खेळ खेळायच्या. नाना प्रकार आहेत. महाराष्ट्रातील स्त्रियांचे हे स्वतंत्र जीवन हा एक विशेष आहे. वारकरी पंथाने स्त्रियांत अधिक मोकळेपणा निर्माण केला. साधुसंतांच्या कीर्तनाला स्त्रिया जात. वारकरी पंथाची दीक्षा त्या घेत. गळ्यात माळ घालीत. पंढरपूरला पायी वारीला जात. शेकडो हजारो स्त्रिया पंढरपूरला आषाढी–कार्तिकीस पायी वारीला जात. ही अपूर्व वस्तू आहे. खांद्यावर पताका नि पडशी, हातांत टाळ, अशा स्वरूपात या भगिनी जात. मुक्ताबाई, जनाबाई, ही नावे महाराष्ट्राच्या भक्तिप्रेमाची. अनेक स्त्रियांनी अभंग रचिले.

वरच्या वर्गातून स्त्रिया थोड्याफार शिकत असाव्यात असे वाटते. चंद्रावळीने सावित्रीचे भव्य गीत रचिले. तिला का लिहिता येत नसेल ? ही चंद्रावळी कोण, कधी झाली, फारशी माहिती नाही, परंतु मराठीतील एक सुंदर खंडकाव्य तिने निर्मिले, जे परंपरेने पवित्र झाले. कहाण्यांचे वाङमय तर स्त्रियांनीच रचिले असावे. त्यातील भाषा फार सुंदर. कहाण्या फार प्राचीन काळा पासून मराठीत आहेत. ओवी वाङ्मयही मराठीत फार प्राचीन काळापासून आहे. स्त्रियांनी हे वाङ्मय तोंडोतोंडी परंपरागत आणले नि जिवंत ठेवले. कथापुराणश्रवण हेच त्यांचे ज्ञानाचे साधन. परंतु काही काही घराण्यातून स्त्रिया शिकत असाव्यात. समर्थ रामदासस्वामी एका घरी भिक्षेला गेले. एक सोवळी भगिनी एकनाथी भागवत वाचीत होती.

“ काय वाचता ? ” समर्थांनी विचारले.

“ नाथांचे भागवत ” त्या माउलीने उत्तर दिले.

“ अर्थ समजतो का ? ” पुन्हा समर्थांचा प्रश्न.

त्या भगिनीने काय उत्तर दिले माहीत नाही. परंतु पुढे समर्थांची

ती शिष्या झाली. समर्थांचे अनेक आश्रम भगिनी चालवीत. वेणाबाई, आक्काबाई इत्यादी समर्थांच्या थोर शिष्या. वेणाबाईने सीतास्वयंवर ' हा सुंदर ओवीबद्ध ग्रंथ लिहिला. या सर्व भगिनी लिहिणाऱ्या-वाचणाऱ्या असल्याच पाहिजेत.

महाराष्ट्रीय भगिनी राजकारणातही सरसावत. सरदारांच्या, प्रतिष्ठितांच्या मुली घोडयावर बसणे, नेमबाजी, यात तरबेज होत असत. छत्रपतीची माता श्री जिजाई ही शहाजी दक्षिणेकडे असता इकडे हिमतीने जहागीरी बघत होती. शिवछत्रपतीस रामायण–महाभारतातील धडे देत होती. तो कोंडाणा मला घेऊन दे, असे सांगत होती. आणि संभाजी महाराजांची पत्नी येसूबाई! ती किती थोर नि हिमतीची! ताराबाईची तेजस्विता इतिहासप्रसिद्धच आहे. गोपिकाबाई, आनंदीबाई यांची राजकारणे चालतच. उमाबाई दाभाडे कशी तेजस्विनी नारी! आणि देवी अहल्याबाई. ती जमाखर्च उत्कृष्ट ठेवी. सासरा तिला मुलाप्रमाणे मानी आणि पुढे दौलतीचा कारभार तिने चालवला. हिंदुस्थानात विख्यात झाली. दरबारात बसे, न्याय देई. हिंदुस्थानभर अन्नछत्रे, घाट. अनेक राजे आपसातला तंटा तोडायला अहल्याबाईकडे जात, अशा आख्यायिका आहेत. रघुनाथराव चालून आले तर घोडयावर बसून सेना घेऊन निघाली, पत्रात लिहिते: "घाबरू नये. मी डेरे दाखल होते." राजवाडा सोडून ती छावणीत येते. रघुनाथराव शरमून जातात. आणि ती भारतभूषण झाशीची राणी! ते धैर्य, ते शौर्य, त्याला तुलना नाही. तटावरून घोडा फेकून फळी फोडून ती जाते. शत्रूंशी झुंजते. मरता मरता पडते. महाराष्ट्रीय भगिनींचा असा हा इतिहास आहे.

कवी मोरोपंत यांच्या सुना पंडिता होत्या. महाकाव्ये पढलेल्या. पंतांच्या आर्यांचा कोणाला अर्थ न कळला तर त्यांच्या सुनांकडे

कीर्तनकार वा दुसरे अर्थजिज्ञासू येत. मोरोपंत उदार विचाराचे. त्यांनी आपल्या मुलाचा हुंडा घेतला नाही. हुंडा घेणे पाप, असे म्हणाले. ते ज्या बारामतीकरांकडे राहत, त्यांच्या मुलींसाठीच त्यांनी सीता-गीत, सावित्रीगीत वगैरे गीते करून दिली. त्या मुली झोपाळ्या-वर बसून ती गीते म्हणत. लोकमान्य टिळकांनी आपल्या मुलींना हीच गीते पाठ करायला सांगितली म्हणतात.

समर्थांचे आश्रम कोठे कोठे भगिनी चालवीत, हे आपण पाहिले. वारकरी पंथानेही स्त्रियांना स्फूर्ती दिली. या सर्वांमुळे महाराष्ट्रात कीर्तनकार स्त्रिया झाल्या. रामशास्त्र्यांच्या वेळेस तुळशीबागेत स्त्रिया कीर्तन करीत, असे उल्लेख आहेत. एकदा एका स्त्री कीर्तन-कारिणीच्या कीर्तनाला स्वत: रामशास्त्री गले होते. ती भगिनी पूर्वरंग रंगवीत होती. विवेचन करता करता ती भगिनी शास्त्रीबोवास भर कीर्तनात प्रश्न करते ! " शास्त्रीबुवा, पुरुषांनी पुन:पुन्हा लग्ने करावीत. एक बायको मेली, दुसरी; ती मेली तर पुन्हा आणखी. परंतु शास्त्राने पुरुषांना ही परवानगी दिली. स्त्रियांना का दिली नाही ? त्यांना का मरेतो वैधव्य ? " शास्त्रीबुवा नि:स्पृह. ते म्हणाले : " स्मृती पुरुषांनी लिहिल्या. त्यांनी पुरुषांची सोय पाहिली. स्त्रियांनी लिहिल्या असत्या तर स्त्रियांनी स्वत:च्या भावनांना अनुरूप लिहिले असते. " रामशास्त्र्यांनी बालविधवांच्या पुनर्विवाहास संमती दिली होती. मोरोपंत, रामशास्त्री ही माणसे काळाच्या पुढे होती, थोर विचारवंत होती म्हणा ना. मानवतेचा उदार धर्म त्यांच्याजवळ होता.

महाराष्ट्रात जरी स्त्रियांना एक प्रकारचा मोकळेपणा होता, तरी सर्व साधारणपणे त्यांना जीवनात खालचेच स्थान. विवाह लहानपणीच व्हायचे. स्वत:ची सुखदु:खे मनातच राहायची, बायकांच्या ओव्यांत हे चित्र आहे—

‘ लेकीचा जन्म, नको देऊ सख्याहरी
जन्मवेरी ताबेदारी, परक्याची ।।
लेकीचा जन्म, जन्म घालून चुकला
बैल घाण्याला जुंपला, जन्मवेरी ।। ’

देवा, मुलीचा जन्म नको देऊ. जन्मवेरी परक्याची ताबेदारी. मरेपर्यंत बैलाप्रमाणे राबायचे. जणू पोटाला चार घास आणि अंगावर वस्त्र, एवढे तिला मिळाले म्हणजे झाले. तिची कशावर सत्ता नाही. देवधर्माला दोन दिडक्या हव्या असल्या तरी त्या मागाव्या लागायच्या. जरा नवऱ्याची मर्जी गेली की अपमान, मारहाण. एकंदरीत जीवनाचा कोंडमाराच.

मी काही जुनी गाणी ऐकली होती. त्यात गावच्या पाटलासमोर नवराबायकोचे भांडण आले आहे. असे सुंदर वर्णन आहे. ती बाई म्हणते : “ पाचा मुखी परमेश्वर असतो. न्याय द्या. हा कसला नवरा ! डोक्याचे पागोटे तीन–तीनदा सोडतो, बांधतो. मिळवायची अक्कल नाही. माझे माहेर केवढे ! याला काही शिकवा. ”

नवरा आपलीही बाजू मांडतो व म्हणतो : “ माहेरची ऐट ही तीनतीनदा सांगते. माझा का हिने आपमान करावा ” वगैरे म्हणजे गावातील अशी भांडणे पंचांसमोर जात की काय ? इंग्लंडमध्ये अशा गोष्टी घडत, असे इतिहास सांगतो. भांडखोर बायकोला नवऱ्याने विहिरीत दोरीला बांधून सोडावे, पाण्यात बुडवावे, वर काढावे, नाकातोंडात पाणी दवडावे--असे प्रकार तिकडे होत. नवऱ्याला असा छळ करण्याचा हक्क असे. आपल्याकडे हक्क होता की नव्हता, प्रभू जाणे. परंतु नवरे बायकांना मारायचे. रस्त्यातूनही मारीत न्यायचे. त्यांचा तो हक्क ! अजूनही अशा समजुती आहेत. स्त्रियांची सुखदुःखे स्त्रियाच जाणत. इतर ठिकाणांपेक्षा महाराष्ट्रात मोकळेपणा दिसतो. परंतु स्त्रीच्या स्वतंत्र आत्म्याचे वैभव ही

निराळीच गोष्ट. ती प्रभा अजून फाकायची होती.

एक प्रकारे भारतवर्षात सर्वत्र स्त्रीची तीच दशा होती. गुजराती लोकगीते, स्त्रीगीते आहेत, त्यातूनही आपल्याकडील ओव्यात स्त्रियांच्या जीवनाचे जसे चित्र आहे तसेच आहे, करुण असेच ते चित्र आहे. गुजरातेतही स्त्रियांना एक प्रकारे मोकळे जीवन आहे. खेड्यापाड्यातील स्त्रिया कामाला जातात, कष्ट करतात. तिकडे गरबागीते वगैरे स्त्रियांचे नृत्य प्रकार आहेत. आपणाकडे फुगड्या वगैरे स्त्रियांचे नाना खेळ आहेत. परंतु गरबनाचासारखे सुंदर प्रकार आपणाकडे नाहीत. सामुदायिक नृत्याचे प्रकार नाना ऋतूंची वर्णने कृष्णाची गाणी—हे सारे प्रकार गरबानृत्यातून येतात.

दक्षिण हिंदुस्थानातील मंदिरापून देवदासी असत. त्या देवासमोर नृत्यगीतादी कलाप्रदर्शन करायच्या. दक्षिणेकडे अनेक घराण्यांतून मुलींना संगीत शिकवण्याची पद्धत असे. संगीताला 'तिकडे मान. नृत्यासही परंतु या गोष्टी सर्रास अशा नसत. अपवादात्मकच. एकंदरीत जीवन चुलीजवळचेच. बाहेरच्या व्यापक जीवनाचा त्यांना स्पर्श नसे. उत्सव, यात्रा, समारंभ या वेळेसच बाहेरची हवा. रोज देवदर्शनास जावे, नदीवर जावे, परंतु सार्वजनिक जीवनात स्थान नसे. पुरुषांप्रमाणेच स्त्रीला बुद्धी आहे, भावना आहेत, तिला आत्मा आहे, तिच्या जीवनाचा सर्वांगीण विकास व्हायला हवा, ही भावना नव्हती. स्त्रीला वाटे की, पुरुषाच्या सेवेतच माझी कृतार्थता. स्वतःला जणू तिने शून्य केले होते. " स्त्रिया यशाची शक्ती " असे सावित्रीगीतात म्हटले असले तरी लगेच पुढे " भ्रताराची करिती भक्ती " असा चरण आहे स्त्रिया धीर देणाऱ्या, कोंड्याचा मांडा करणाऱ्या, घरी आल्यावर तुम्हांस सुखशान्ती देणाऱ्या. जगात कोठे आधार नसला तरी घरी आहे. घरी तेल नसले तरी प्रेमस्नेहाचा दिवा पाजळून स्त्री बसलेली आहे. स्त्रीची

शक्ती जगात गाजली नाही, तरी जीवनात ती अनुभवाला येते. पतंग जगाला दिसतो, परंतु त्याला नाचवणारा तो बारीक धागा असतो. त्याप्रमाणे स्त्रीचा तो आधार तुमच्या यशाचा पाया असतो. स्त्रीचा असा महिमा असला तरी तिच्या संपूर्ण जीवनाचा विकास-तो आम्ही कधी पाहिला नाही. स्त्रियांनीही जे समाजाने दिले त्यातच समाधान मानले. त्यांनी बंड केले नाही.

‘ रुसवेफुगवे त्यांत प्रेम पिकविते । ’

घरात रुसवे, फुगवे, परंतु त्यातच मी प्रेम पिकविते, अशी जुनी महाराष्ट्रीय भगिनी सांगते. स्त्रियांचा हा मोठेपणा तर खराच. परंतु अत:पर तेवढ्याने स्त्रियांना वा पुरुषांना समाधान वाटता कामा नये.

मी खानदेशातील खेड्यांतून हिंडायचा. “ घरात कोण आहे ?” मी विचारी. “घरात माणसे नाहीत” मला सांगण्यात येई. बायका तर घरात असत. पुरुष म्हणजे माणसे असा खानदेशी अर्थ. बायकांना कोण माणूस म्हणतो ? बायकांत अभिजात मानवताही जणू आम्ही विसरून गेलो. त्यांना स्वतंत्र अस्तित्व आहे. व्यक्तिमत्त्व आहे, आत्मा आहे, हृदय आहे, बुद्धी आहे, सुखदु:खे आहेत, हे आम्ही विसरून गेलो. खानदेशात पेरणी करायची असली म्हणजे भरल्या कपाळाची स्त्री शेतात घेऊन जातात. तिच्या हाताने आरंभ करतात. ती सुवासिनी आणि गतधवा असेल तर ती अशुभ ! शुभाशुभ का अशा गोष्टींवर अवलंबून आहे ? परंतु समजुती असतात. व्यक्तीला अभिजात स्वतंत्र महत्त्व आहे, हे आम्ही विसरून गेलो. सर्व जगात हीच तऱ्हा. खरे स्वातंत्र्य अजून यायचेच आहे. जोवर दुसऱ्याच्या आत्म्याची प्रतिष्ठा आपणास कळली नाही तोवर स्वातंत्र्याचा अर्थ आपणांस कळला असे मी तरी म्हणणार नाही.

* * *

# इंग्रजी अमदानी

इंग्रजी अमदानीत पाश्चात्य जगाशी, अर्वाचीन संस्कृतीशी भारताचा संबंध आला, चीन आणि हिंदुस्थान दोन प्राचीनतम राष्ट्रे. परंतु घरातच स्वयंतृप्त राहिल्यामुळे ज्ञानविज्ञानात मागे राहिली. दीडदोन हजार वर्षांपूर्वी गोबीची वाळवंटे ओलांडून हिंदी पंडित चीनमध्ये बुद्ध धर्म घेऊन गेले. चिनी भाषा शिकून तिच्यात त्यांनी संस्कृत ग्रंथ अनुवादले. भारतीय तत्त्वज्ञ आणि भारतीय व्यापारी दशदिशात जात होते. परंतु ती स्फूर्ती, ते साहस सारे लोपले आणि आपण घरकोंबडे बनलो. युरोप पुढारले. तो वास्को द गामा अटलांटिक नि हिंदी महासागर ओलांडून येतो. तो कोलंबस तिकडे पॅसिफिक ओलांडतो. चालले जगभर युरोपचे धाडसी नावाडी. प्रचंड दर्यावर चिमुकली गलबते घेऊन जाताहेत.

हिंदुस्थानात युरोपियन लोक येऊ लागले. पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रज आले. युरोपातील भांडणे घेऊन इकडे आले. त्या भांडणात शेवटी इंग्रज विजयी झाले. हिंदुस्थानात ब्रिटिश सत्ता आली. नवसंस्कृतीशी भारतीय संस्कृतीचा संबंध आला. नवीन शिक्षणपद्धती आली. नवी विद्यापीठे स्थापन झाली. छापखाने सुरू झाले. १८४८ मध्ये पुण्याचा ज्ञानप्रकाश सुरू झाला. लोकहितवादी लिहू लागले. नवीन युग आले.

आपल्याकडे तर लहापणीच लग्ने होत. परंतु मुलगे थोडेफार शिकू लागले. मुलींचे काय ? इंग्रजी शिकणे अवश्य तरी अधर्मरूप वाटे. इंग्रजी शब्द घोकायला दूर जाऊन बसावे लागत असे. इंग्रजी शाळेतून आल्यावर बाहेर बसवून डोक्यावर पाणी ओतून मग घरात घेत. अशी स्थिती होती. अशा काळात पुण्यात महात्मा ज्योतिबा फुल्यांनी अस्पृश्यांच्या मुलींसाठी छात्रालय काढले. अजून ब्राह्मणांच्या मुलीही शाळेत जाऊ लागल्या नव्हत्या तो ज्योतिबांची

केवढी धडाडी ! शिक्षणाशिवाय मागासलेला समाज पुढे येणे कठीण आणि स्त्रिया सुशिक्षित होत नाहीत तोवर सारेच फोल.

त्या काळात एक नाव डोळ्यासमोर ठसठशीतपणे उभे राहते. पंडिता रमाबाईंचे नाव. अनेक आपत्तींतून त्या नि त्यांचे कुटुंब गेलेले. त्या संस्कृतमध्ये सुंदर बोलत. कलकत्त्यात त्यांनी संस्कृतमध्ये खूप भाषणे केली. स्त्रियांना शिक्षण मिळाले पाहिजे, म्हणून कोण त्यांची तळमळ ! परंतु महाराष्ट्रात त्यांचा उपहास होऊ लागला. पंडिता रमाबाईंची अपार महत्त्वाकांक्षा. महाराष्ट्रीय भगिनींना ज्ञानदान देण्याची त्यांना केवढी तळमळ. परंतु स्वधर्मात राहून हे करता येईल असे त्यांना दिसेना ! कोण देणार पैसा, कोण देणार आधार ? ख्रिस्ती धर्म स्वीकारला तर पैसा मिळेल, सरकारी आधार मिळेल, असे त्यांना वाटले. परंतु तेथे हिंदी स्त्रिया येणार कशा ? ते त्यांच्या लक्षात आले नाही. शारदासदन संस्था त्यांनी स्थापिली. त्यांचा उपहास झाला. पंडिता रमाबाई अमेरिकेत गेल्या तिकडे त्यांनी व्याख्याने दिली. परधर्मात जाऊन स्वकीयांची सेवा करणे कठीण होते. समाजात राहूनच सेवा करता येईल. समाजाचे शिव्याशाप खातच सेवा करीत राहिले पाहिजे. कोणावर रागावता रुसता ? आपलेच ओठ नि आपलेच दात.

पुण्याचे श्री. गोपाळराव जोशी यांनी आपल्या पत्नीस अमेरिकेत पाठविण्याचें धाडस केले. आनंदीबाई त्यांचे नाव. मराठीत त्यांचे चरित्र आहे. काही सुंदर चरित्रांपैकी ते एक आहे. आनंदीबाई अमेरिकेत गेल्या. त्या डॉक्टर झाल्या. तिकडेही त्या हिंदी पद्धतीने राहत. भारतीय विचार, राहणी यांविषयी त्यांनी आदर उत्पन्न केला. तिकडील भगिनींना पुरणपोळी वगैरे करून खायला द्यायच्या. त्यांनाही कधी साडी नेसवायच्या. अती मनमिळाऊ, कष्टाळू आणि सद्‌गुणी. परंतु डॉ. आनंदीबाईंना देवाने आयुष्य कमी दिले. त्या

लौकरच देवाघरी गेल्या. एक निर्मळ सुगंधी फूल सेवा करणार तोच सुकून गेले.

स्त्रियांना शिक्षण मिळाले पाहिजे, म्हणून प्रचार सुरू झाला. काँग्रेसची स्थापना झाली होती. काँग्रेसच्या अधिवेशनाबरोबर सामाजिक सुधारणांचे अधिवेशन न्या. रानडे भरवू लागले. सामाजिक सुधारणेच्या अधिवेशनाचे ते प्राण होते. त्यांची ती भाषणे अती उद्‌बोधक आहेत. आगरकर स्त्रियांचा आत्मा मुक्त व्हावा म्हणून सर्वशक्तीनिशी लढत होते. तिकडे स्वामी दयानंदांच्या स्फूर्तीने स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रश्न असा पुढे येत होता तर बंगालमध्ये पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी पुनर्विवाहाचा प्रश्न हाती घेतला. स्त्रियांना पुनर्विवाहाची का अनुज्ञा नसावी ? राजा राममोहन राय यांनी बंगालभर नवविचारांची गुढी उभारली. सतीसारख्या चाली बंद पाडायला ब्रिटिश सरकारला त्यांनी नैतिक पाठिंबा दिला. परंतु स्त्रियांचा सर्व प्रकारे आत्मा मुक्त व्हावा म्हणून प्रयत्न हवे होते. सहस्रमुखी प्रयत्न हवे होते. बालविधवांना का मरेपर्यंत संन्यासाची दीक्षा देऊन सक्तीने अंधारात ठेवायचे ? ती कठोरता अमानुष होती. विद्यासागर कळवळले. शास्त्राधार मिळावा म्हणून कलकत्त्यास रात्रंदिवस ते स्मृतिग्रंथ बघत राहिले. आणि एके दिवशी पहाटे त्यांना स्त्रियांना पुनर्विवाहाची परवानगी देणारे वचन आढळले. त्यांच्या आनंदास पारावार राहिला नाही. विद्यासागर पुनर्विवाह रूढ करायला उत्सुक होते. तळमळीने म्हणायचे : “ माझी मुलगी विधवा झाली तर तिचा पुनर्विवाह करीन नि समाजाला उदाहरण घालून देईन. ” महाराष्ट्रातही हे विचार आले. आणि महर्षी अण्णासाहेब कर्वे यांनी पुनर्विवाह केला. हरी बल्लाळ परचुरे यांनी पुनर्विवाह केला. हे दोघे धर्मवीर दापोली तालुक्यातलेच. दोघांवर बहिष्कार पडले. महर्षी कर्वे पाच वर्षांपूर्वी म्हणाले :

" अजून मरूडला गेलो तरी निराळे बसवतात जेवायला !" मग त्या काळात परिस्थिती कशी असेल ? इंग्रजी वाङमयाने नवीन वाङ्मयप्रकार येत होते. कादंबरी हा त्यातलाच प्रकार. कादंबरी समाजात क्रांती करू शकते. हरिभाऊंच्या ' पण लक्षात कोण घेतो ! या कादंबरीने महाराष्ट्रीय जनतेचे हृदय हलवले. बाबा पदमजींची ' यमुनापर्यटन ' कादंबरी यापूर्वी बरीच वर्षे प्रसिद्ध झाली होती. तीही एका विधवेचीच करुण कथा. परंतु ती कथा मागे पडली. एका खिश्चन झालेल्या बंधूने लिहिलेली म्हणून ती कादंबरी मागे पडली असेल. परंतु सामाजिक प्रश्न हाती घेऊन ती लिहिलेली होती. अशा प्रकारे स्त्रियांची स्थिती सुधारावी म्हणून साहित्यिकही पुढे येऊ लागले.

पुण्याची हुजूरपागा फार जुनी मुलींची शाळा. बोर्डिंगही होते. आरंभी हिंदुधर्मी मुलींसाठी निराळे, ज्यू मुलींसाठी निराळे अशी तेथे बोर्डिंगे होती. तिकडे एक पंचहौद मिशन शाळा होती. परंतु तेथे चार इयत्तांपर्यंतच शिक्षण मिळे. तेथे खिश्चन झालेल्या मुलीच बहुधा शिकत. त्या पाचवीपासून मग हुजूरपागेत येत. हुजूरपागा इंग्रजी शिक्षण देऊ लागली. तिकडे महर्षी कर्वे यांनी पुण्याजवळ हिंगणे येथे अनाथ बालिकाश्रम स्थापिला. तेथे मुलींची मराठी शाळा होती. प्रथम तर चारा इयत्तांपर्यंतच तेथे शिक्षण मिळे. १९०८ सालानंतर तेथे मराठी सातवीपर्यंतचे शिक्षण मिळू लागले व पुढे फायनलला मुली बसू लागल्या. इंग्रजी तीन इयत्तांपर्यंतही तेथे शिक्षण मिळू लागले. कर्व्यांच्या संस्थेमार्फतच महिला विद्यालय म्हणून संस्था लकडीपुलाजवळ चालवण्यात येत असे. ती संस्था वसतिगृहच होते म्हणाना. कर्व्यांच्या पत्नी बाया याच तेथे व्यवस्था बघत. तेथील काही मुली हुजूरपागेत जात, काही न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिकत. असे हे प्रयत्न शहरातून होऊ लागले. मोठ्या शहरातून जिल्ह्याच्या, तालुक्याच्या गावांपर्यंत शिक्षणाचे लोण थोडे थोडे जाऊ लागले.

श्रीमंत सयाजीराव महाराज हे पुढारलेल्या विचारांचे. स्त्रियांचे

शिक्षण व्हावे, हरिजन पुढे यावेत, म्हणून त्यांना तळमळ. श्री काशीबाई हेर्लेकर या बडोद्यास त्या वेळेस पुढे आल्या. बडोद्यास स्त्रियांचे ट्रेनिंग कॉलेज व मुलींचे हायस्कूल या संस्था प्रथम एकत्रच होत्या. मिस् मेरी भोर या बडोद्याच्या ट्रेनिंग स्कूलच्या काही दिवस मुख्य होत्या. श्री. काशीबाई हेर्लेकर तेथील ट्रेनिंग कॉलेजात शिक्षक होत्या. त्या शिक्षकच राहिल्या. त्यांच्या विद्यार्थिनी येऊन तेथे मुख्य झाल्या. काशीबाईंच्या आई सगुणाबाई देव याही चांगल्या सुशिक्षित होत्या.मराठी तर त्यांना येईच,परंतु इंग्रजीही त्या शिकल्या. काशीबाईंना विद्येची गोडी आईपासून मिळाली. अगदी आरंभीच्या अर्वाचीन मराठी लेखिकांत काशीबाईंचे स्थान आहे. स्त्री-स्वातंत्र्या-साठी त्यांना घरीही त्रास सोसावा लागे. परंतु सहनशीलपणाने त्यांनी सारे सहन केले. स्त्रिया स्वातंत्र्यास योग्य आहेत, असे पुरुषांना पटवले. तो संक्रमणावस्थेचा काळ होता, सुशिक्षित स्त्रियां-वर जबाबदारी होती. आणि काशीबाई हेर्लेकर म्हणजे एक असे आदर्श उदाहरण. श्री. शांताबाई कशाळकर, सौ. गीता रानडे या त्यांच्याच सुविद्य मुली.

मुलींच्या शिक्षणाला थोडीफार सुरुवात झाली. मराठी श्रीगणेशा तरी येऊ लागला. शिक्षणाला आरंभ होणे म्हणजे विवाहकाळ पुढे जाणे. कारण चार इयत्ता व्हायच्या म्हटल्या तरी दहा बारा वर्षांची मुलगी होणार. आणि इंग्रजी शिकायचे म्हटले तर वयाची मर्यादा आणखीच पुढे यायची. आणि त्या प्रश्नांवर खडाजंगी माजली. केसरी आणि सुधारक यांतून स्तंभच्या स्तंभ लेख येऊ लागले. मुलींच्या विवाहाची वयोमर्यादा काय असावी, हाच जणू महान राष्ट्रीय प्रश्न होऊन बसला.

मुलींच्या वयाचे प्रश्न त्याचप्रमाणे हुंड्यासारख्या घातुक चालीही होत्या. मुलींना सतरा ठिकाणी दाखवायला न्यायचे ! ज्या वेळेस शिक्षणच नसेल त्या वेळेस नाकडोळे बघून, चालते कशी, बोलते कशी बघून, लग्न करीत असावेत. मुली शिकायल्या लागल्या तर

त्यांचे शिक्षण वगैरे बघावे. मुली शिकल्या, परंतु मुलींची प्रतिष्ठा वाढली नाही. महर्षी सेनापती नेहमी म्हणतात: "मुलगी ही देण्याघेण्याची वस्तू नाही. मुलगेमुली आपापल्या अनुकूल वधूवर निवडून विवाह करतील. आईबापांनी, पालकांनी, आशीर्वाद द्यावा. इतर काही अडचणी असतील तर दूर कराव्या." परंतु मुलीच्या आत्म्याला ही प्रतिष्ठा अजून यावयाची आहे.

राम गणेश गडकरी हे कवी नाटककार तसेच जबरे विनोदी लेखक. त्यांनी 'ठकीचे लग्न' म्हणून विनोदी लेखमाला लिहिली. मुलीचे लग्न मोडायला सतराशे विघ्ने कशी आड येतात, ते त्यांनी अती विनोदाने दाखवले आहे. कोठे मंगळ आड येतो, कोठे नाडी जमत नाही, कोठे गण विघ्न आणतो, तर कोठे हुंड्यापायी जमत नाही. सतरा प्रकार. मुलींची विटंबना थांबत नव्हती. त्यांच्या जिवाचा गुदमरा होत असेल. पूर्वी लहानपणी लग्ने करीत तेव्हा जाणीव तरी आलेली नसे. परंतु आता शिक्षण मिळू लागले. थोडे फार वय वाढू लागले. पुस्तके वाचनात येऊ लागली. कधी कादंबरी हातात पडावी, कधी नाटक. प्रेम वगैरे शब्द कानांवर येऊ लागले. भावना वाढू लागल्या. हृदय विकसू लागले. परंतु आईबापांची, समाजाची वृत्ती जुनाटच. वाढत्या परिस्थित्यनुरूप वाढती दृष्टी नाही, वाढती सहानुभूती नाही. कधी कधी या लहान मुलीचा थेरड्याशीही विवाह करीत. मुलींचे पैसे घेत. मुलाचे काय, मुलीचे काय पैसे घेणे पाप. काही जातींतून मुलामुलींचे लग्ने होणे कठिण जाते. मुलाला मुलीच्या बापाला पैसे द्यावे लागतात. काही गुजराती जातीत ही अनिष्ट चाल आहे. चार मुली असल्या तर बाप म्हणतो: "ही माझी इस्टेट, चारी जणींचे दहाबारा हजार तर खरे." मद्रासकडे मुलींचे सालंकृत कन्यादान करण्याची चाल म्हणून अडचण. विवाह म्हणजे वधूवरांनी एकमेकांस हृदय देणे, ही गोष्ट कधी होईल? मराठीतील शारदा नाटकाने केवढी खळबळ माजविली? देवलांचे हे अपूर्व नाटक. त्यातील गाणी खेड्या-

पाड्यांपर्यंत गेली. ‘ लग्ना अजून लहान । अवघे पाउणशे वयमान ॥ ’ इत्यादी गाणी सर्वांच्या ओठांवर खेळू लागली. अशा रीतीने स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यात येत होती.

देश स्वतंत्र व्हावा म्हणून देशात बाँब आले, पिस्तुले आली. लोकमान्य काळ्या पाण्यावर चालले. खुदीराम फाशी गेला. क्रान्तिकारक अंदमानात चालले. देश स्वतंत्र व्हावा म्हणून ना ही सारी बलिदाने ? परंतु देश स्वतंत्र व्हावा म्हणजे काय ? देशातील नरनारींची जीवने विकसित व्हावीत, हा ना स्वातंत्र्याचा अर्थ ? स्त्रियांच्या जीवनाचा विकास कधी होणार ? तरुण देशभक्तीच्या गोष्टी बोलत आहेत, स्वदेशीच्या शपथा घेत आहेत, परंतु लग्नाच्या वेळेस हुंडे घेत आहेत ! हे विचित्र नव्हे का ?

आणि म्हणून बंगालमधील मुलगी स्नेहलता बलिदानार्थ उभी राहते. ती पत्र लिहिते : “ हुंड्याच्या चालीमुळे मुलींची दैना होते. आईबापांना मुलगी म्हणजे संकट वाटते. देशातील तरुणांना आपल्या भगिनींची विटंबना थांबावी असे नाही वाटत ? ही हुंड्याची चाल बंद व्हावी म्हणून मी स्वतःचे प्राण देत आहे. ” स्नेहलतेने अशा आशयाचे पत्र लिहून ठेवले. तिने अंगावर रॉकेल ओतून काडी लावली. त्या दिव्य ज्वालेने क्षणभर भारतीय तरुणांच्या जीवनात प्रकाश आला. ठायी ठायी युवकांच्या सभा झाल्या. हुंडा न घेण्याच्या प्रतिज्ञा झाल्या.

स्त्रियांचे शिक्षण, साहित्यिकांचे प्रयत्न, आणि स्नेहलतेचे बलिदान अशा अनेक मार्गांनी स्त्रियांच्या जीवनात नवीन प्रकाश येऊ लागला. शिक्षण वाढू लागले. क्वचित् पदवीधर भगिनी दिसू लागल्या आणि स्त्रियांचे शिक्षण हाती घ्यायला. सेवासदन, सूतिकागृहे इत्यादी संस्था काढायला भगिनीच हिंमतीने पुढे येऊ लागल्या. महाराष्ट्रातील सेवासदन संस्थेचे या दृष्टीने फार थोर कार्य आहे. तो इतिहास पुढे पाहू.

* * *

हिंदी स्त्रिया थोडे फार शिकू लागल्या. अर्थात् खालपर्यंत अजून शिक्षण गेलेच नव्हते. आजही नाही गेले तर ३०-४० वर्षांपूर्वीची गोष्ट विचारायलाच नको. परंतु मुलींना शाळेत घातले पाहिजे याला फारसा विरोध आता राहिला नव्हता. स्त्रियांनीच स्त्रियांची उन्नती करायला पुढे यायला हवे होते. महर्षी कर्वे यांच्या संस्था वाढल्या. त्यांना चिपळूणकरांसारखे उत्साही सहकारी लाभले. चिपळूणकर अमेरिकेतून शिकून आलेले. अती उत्साही नि कळकळीचे. हिंगण्याचे प्रयत्न अविरत चालू होते. आणि पुण्यात सेवासदन निघाले. त्या वेळेस न्या. रानड्यांच्या पत्नी रमाबाई हयात होत्या. भारत सेवक समाजाचे थोर सेवक गोपाळ कृष्ण देवधर यांनी सेवासदनाचा पाया घातला. रमाबाईंनी त्या कामाला वाहून घेतले. सेवासदनाचा आज अपार पसारा आहे. अनेक ठिकाणी त्याच्या शाखा आहेत.

हिंदुस्थानातील मोठमोठ्या दवाखान्यातून हिंदी परिचारिका नसत. गोऱ्या किंवा ऐतद्देशीय ख्रिश्चन किंवा ज्यू परिचारिका असत. या देशात शिक्षणच नव्हते. स्त्रियांनी निर्भयपणे काम करण्याची परंपरा नव्हती. संस्थांतून नोकरी–चाकरी करण्याची रूढी नव्हती. दळण-कांडण, स्वयंपाक, भांडी घासणे हेच त्यांचे धंदे, परिचारिका होणे, डॉक्टर होणे, वकील होणे, शिक्षक होणे, समाजातील अनेक क्षेत्रांत जाणे, स्वावलंबी होणे, स्वाभिमानाने भाकरी मिळवणे हे अजून नव्हते. सेवासदनाने ही कोंडी फोडली. सेवासदनाने परिचारिकांचा, सेविकांचा वर्ग काढला. विधवा हिंदी स्त्रियांना नवमार्ग दाखविला. त्यांच्या निराश, अंधारमय जीवनात प्रकाश आणला. हळूहळू हे वातावरण सर्वत्र पसरले. दवाखान्यात देशी परिचारिका नसत म्हणून आजारी स्त्रिया तेथे राहायला तयार नसत. परंतु आता

दवाखान्यात राहायला त्या नाखूष नसतात.

अमेरिकेतील प्राथमिक शिक्षण स्त्रियांच्या हाती आहे. आपल्याकडे स्त्रिया शिक्षक होऊ लागल्या. सेवासदनाने स्त्रियांचे ट्रेनिंग कॉलेज काढले. पुढे आणखी निघाली. लहान मुलामुलींना स्त्रियांनीच शिकवावे. स्त्रियांचा स्वभाव प्रेमळ नि कोमल असतो. प्लेटो म्हणतो : " ज्याला मुलाविषयी प्रेम वाटत नाही, त्याने शिक्षक होऊ नये. " स्त्रिया उच्च शिक्षण घेऊ लागल्या. पदवीधर होऊ लागल्या. लेखन करू लागल्या. मुलींच्या शाळा चालवू लागल्या. किती तरी प्रथितयश अशा साहित्यिक स्त्रिया डोळ्यांसमोर येतात.

परंतु स्त्रियांचे शिक्षण असे वाढू लागले तरी खरी दृष्टी त्याच्या पाठीमागे नव्हती. अजूनही नर्सिंगचा कोर्स घेतला तर लग्न व्हायला अडचणी येतील, असे आईबापांना वाटते, पालकांना वाटते. लग्नासाठी सारे, अशीच वृत्ती आहे. मुलांना शिकवताना त्याचे लग्न व्हायचे आहे ही भावना नसते. मुलींना शिकवताना ती असते. " न शिकेल तर लग्न कसे होईल ? " असे म्हणतात. लग्नासाठी शिकायचे. स्त्रियांनी का शिकावे ? कोण म्हणतील. " लग्न व्हायला अडचण येऊ नये म्हणून. " दुसरे म्हणतील : " हिशेब ठेवील, दुकानातून माल आणील. धोब्याला कपडे किती दिले वगैरे लिहून ठेवील. " आणखी कोणी म्हणतील : " पतीबरोबर वादविवाद करील. काव्यशास्त्रविनोद करील. कलात्मक व साहित्यिक आनंद उपभोगायला पतीला बाहेर नको जायला. आपली बायको भुक्कड, नुसती चूल फुंकणारी, असे त्याला नको वाटायला. " अशा या नाना दृष्टी असतात. परंतु यातील एकही खरी नाही. स्त्रियांनी का शिकावे ? त्यांना आत्मा आहे म्हणून, त्या मानव आहेत म्हणून. शिक्षणाचा इतर काय उपयोग व्हायचा असेल तो होईल, परंतु स्वतःच्या विकासासाठी शिकायचे. देहाला भाकरी

हवी तशी मनाला विचाराची भाकर हवी. स्त्रियांची मनोबुद्धी का उपाशी ठेवायची ? ही दृष्टी शिक्षण घेणाऱ्या स्त्रियात नव्हती, त्यांना शिक्षण देणाऱ्यांमध्येही क्वचितच असे.

इंग्रजी शिकलेल्यांची जशी एक स्वतंत्र जात झाली, तशीच सुशिक्षित स्त्रियांचीही होऊ लागली. साहेबी पोषाख करावा, नटावे, मुरडावे, असे सुशिक्षित पुरुषांस वाटे, तसेच सुशिक्षित स्त्रियांसही वाटे, सुशिक्षित स्त्री-पुरुष परदेशी मालाच्या जिवंत जाहिराती असत ! स्वदेशी, परदेशी, विचारच आमच्याजवळ नसे. देशी जनतेजवळ जणू संबंध राहिला नाही. आपल्याच कोटचवधी बंधूंना तुच्छ मानणे हा आमच्या शिक्षणाचा परिणाम झाला. पुष्कळ वर्षांपूर्वी एकदा एक मित्र मला म्हणाले: "मी आगगाडीतून प्रवास करताना टॉमीचा पोषाक करतो. डोक्यावर हॅट, हातात छडी, शॉर्ट खाकी पॅंट. मग मला नेहमी जागा मिळे ! " असे करण्यात सुशिक्षितांना प्रतिष्ठा वाटे. पुरुषापेक्षा स्त्रियात सजण्याची वृत्ती अधिकच असते. सुशिक्षित स्त्रियांचे समाज म्हणजे परदेशी मालाची प्रदर्शने वाटत !

देशात स्वराज्याचे स्वातंत्र्याचे लढे सुरू होते, स्वदेशीच्या काळात ‘देशी बांगडचाच घालू ’ म्हणून काही भगिनी शपथा घेतल्या. ‘सगळचाने विणलेले गावठी लुगडेच वापरू ’ अशा शपथा घेतल्या. लोकमान्य टिळकांच्यामुळे महाराष्ट्रातील पांढरपेशा स्त्रियांत थोडीफार जागृती आली. परंतु तात्पुरती. अजून हृदय हलले नव्हते. देशातील नवीन ध्येये स्त्रियांपर्यंत जाऊन पोचली नव्हती.

या सुमारास महात्माजी दक्षिण आफ्रिकेतून आले. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी स्त्रियांनी नवीन इतिहास लिहिला होता. कडेवर मुले घेऊन हिंदी मायभगिनी त्या दूर देशात सत्याग्रहात सामील झाल्या होत्या, तुरुंगात गेल्या होत्या, आणि त्यांनी बलीदानही केले होते.

महात्माजी कस्तुरबांना म्हणाले : "तू तुरुंगात मेलीस तर जगदंबे-प्रमाणे मी तुझी पूजा करीन." भारतीय नारीचे तेज पुन्हा प्रकट होऊ लागले होते. देवी सरोजिनी, ॲनी बेझंट या इकडे व्याख्याने देत होत्या. सरोजिनींनी गोखल्यांच्या आज्ञेवरून हिंदु-मुस्लीम ऐक्यार्थ दौरा काढला. गोखले त्यांना 'हिंदचा बुलबुल' असे म्हणत. सरोजिनींनी इंग्रजीत अप्रतिम कविता लिहिलेल्या. यापूर्वी बंगालमधील तरुलता दत्त ( तोरू दत्त ) या तरुण मुलीने इंग्रजीत कविता लिहिल्या होत्या. तोरू अल्पवयात मरण पावली. तिला अनेक भाषा येत. फ्रेंच भाषेत ती पारंगत होती. ती जगती तर तिच्या प्रतिभेचा परिमल जगभर जाता. आणि पुढे सरोजिनी आली. ॲनी बेझंट बाईंनी नि टिळकांनी स्वराज्याची चळवळ सुरू केलेली. सरोजिनींनी त्यातही भाग घेतला. परंतु खेड्यापाड्यांत जाऊन जनतेची सेवा करणे, स्वयंसेवक होणे ही गोष्ट नवीन होती. आम जनतेत ही भावना अजून गेली नव्हती. स्त्रियांत तर नव्हतीच. परंतु महात्माजींनी हाक मारली. चंपारण्यातील शेत-कऱ्यांचा प्रश्न सोडवायला ते गेले. परंतु महात्माजींचे सारे काम पायाशुद्ध. तेथील जनतेत त्यांना प्राण ओतायचा होता. त्यांनी स्वयंसेवक भगिनींचीही मागणी केली : ज्या शेतकरी मायबहिणींत जातील. आणि हिंदी स्त्रिया पुढे आल्या.

श्रीमती अवन्तिकाबाई गोखले त्या वेळेस बिहारमध्ये गेल्या. कस्तुरबांबरोबर काम करू लागल्या. अवन्तिकाबाईंनी गांधीजींचे पहिले चरित्र मराठीत लिहिले व लोकमान्यांनी त्याला प्रस्तावना लिहिली. असा हा आरंभ होता. राष्ट्राच्या जीवनात स्त्रियांनी समरस होण्याचा तो मंगल आरंभ होता. महात्माजींनी राष्ट्र-व्यापक आंदोलनास सुरुवात केली. सत्याग्रह आला. असहकार आला. पिकेटिंग आले. नेहरूंच्या, देशबंधूंच्या घराण्यातील स्त्रिया

जाडीभरडी खादी नेसून मिरवणुका काढू लागल्या. लाठीमार होऊ लागला. कलकत्त्याच्या विलायती मालावर निरोधन करायला वासंतीदेवी उभ्या राहिल्या. स्त्रियांचा आत्मा मुक्त झाला. हजारो वर्षांचे ग्रहण जणू सुटले. सतीचे तेज पुन्हा प्रकटले. अब्बास तय्यबजींच्या कुटुंबातील मंडळी, अल्ली बंधूंची माता बीअम्मा, अशा मुस्लीम भगिनीही सभातून, सत्याग्रहातून झळकू लागल्या.

२० ते ३० साल या काळात ठायी ठायी आश्रम निघाले. आश्रमवासियांच्या पत्नीही त्यात सामील झाल्या. अनेक भगिनींना सेवेची, साधेपणाची दीक्षा मिळाली. शिक्षणात संस्कृती येऊ लागली. लो. टिळक म्हणत : " जो दुसऱ्याच्या सुखदु:खाचा विचार करू लागला तो शिकला." ते खरे शिक्षण स्त्रियांना मिळू लागले. आणि महात्माजींचा मिठाचा सत्यग्राह आला. भारतीय नारीही सरसावल्या. दारूच्या दुकानांवर, परदेशी मलावर निरोधन करायला त्या उभ्या राहिल्या. मिठाचा कायदा तोडू लागल्या. जंगलचे कायदे तोडू लागल्या. महर्षी कर्वे जगाची यात्रा करून मुंबईस आले होते. पोलिसांच्या लाठ्यांना न भिता स्त्रिया ' नही रखनी नही रखनी, जालिम सरकार नही रखनी ' गाणे म्हणत बेकायदा मीठ करायला जात होत्या. अण्णा म्हणाले ! " ते दृश्य पाहून माझ्या डोळ्यांचे पारणे फिटले ! " स्त्रियांनी शिकावे असे अण्णांना का वाटे ? केव्हा त्यांच्या डोळ्यांचे पारणे फिटणार होते ? लहान संसार सोडून त्या मोठ्या संसारातही पडतील तेव्हा. स्वत:चा संसार राष्ट्राच्या जीवनाशी, मानवजातीच्या जीवनाशी जोडतील तेव्हा. हिंदुस्थानभर स्त्रियांनी ३० नि ३२ साली अपूर्व तेज प्रकटविले. धारासना येथे उन्हात सरोजिनीदेवी सत्याग्रहात बसल्या होत्या, बोरसद येथे गुढघे रक्तबंबाळ झाले तरी रस्त्यातून स्त्रिया उठल्या नाहीत. मुलींनी लाठीमार सहन करीत प्रभातफेऱ्या काढल्या. अनेक ठिकाणी

मुलींनी झेंडे लावले. खेड्यापाड्यांपर्यंत ही चळवळ गेली. सत्याग्रहींचा सत्कार करण्यात येई. त्यात स्त्रियाही सामील होत. आरत्या ओवाळीत. तिकडे बार्डोलीच्या लढ्याच्या वेळेस सरदार म्हणायचे : " स्त्रियांनाही सभेला आणा. मग मी बोलेन. तुम्हांला पकडून नेले तर त्यांना लढावे लागेल." देशभर शेकडो स्त्रिया तुरुंगात गेल्या. कलकत्याला स्त्रियांना मोटारीत घालून पोलिसांनी रानात नेऊन सोडले. परंतु त्या भ्यायल्या नाहीत.

फैजपूर काँग्रेसच्या वेळेस महाराष्ट्रातून शेकडो भगिनी सेवादल सैनिक होऊन आल्या. पुण्याला त्या वेळेस त्यांचा उपहास करण्यात आला. खानदेशातील भगिनींनी गावोगाव काँग्रेस प्रचार केला. पायात न घालता प्रचार केला. गीताबाई पायी झेंडावंदनास दहा मैल जात. किती तरी भगिनी देशप्रेमाने पेटल्या होत्या. नवऱ्यांना पसंत पडेना. तेव्हा काडीमोडीही जातीच्या नियमाप्रमाणे झाल्या. परंतु भगिनींनी आत्मस्वातंत्र्य सांभाळले. पुढे काँग्रेसची मंत्रिमंडळे आली. स्त्रियांचे साक्षरतेचे वर्ग सुरू झाले. खानदेशातील खिरोदे गावी पाऊणशे बायका रात्री शिकायला जमत. दिवसा शेतात काम करीत. अमळनेरला एक ७० वर्षांची वृद्ध माता म्हणाली: " मला शिकायचे आहे." राजेन्द्रबाबू महाराष्ट्रात दौऱ्यावर होते. अंमळनेर तालुक्यातील नांदेड गावी पुरुषांपेक्षा थोड्या अधिकच स्त्रिया असतील सभेला. शेकडो स्त्रिया. राजेन्द्रबाबू म्हणाले: " असे दृश्य शहरातही मी पाहिले नाही." स्वातंत्र्याची चळवळ सत्याग्रह, आश्रम, अनेक गोष्टींमुळे खालच्या थरापर्यंत जागृती गेली. हरिजन भगिनींतही त्यांच्या सत्याग्रहामुळे चैतन्य आले. नाशिकच्या राममंदिर सत्याग्रहात हरिजन भगिनी तुरुंगात आल्या! महात्माजींच्या सभेला हजारो भगिनी जमायच्या. सामुदायिक प्रार्थना भगिनी चालवायच्या. स्वातंत्र्याच्या लढ्याने ब्रिटिशांची गुलामगिरी जात होतीच; परंतु घरच्या गुलामगिरीचेही पाश तुटते होते.

आणि ४२ चा चलेजाव लढा आला. भारतीय नारींनी बलिदान केले. तो अश्रूचा नि रक्ताचा इतिहास आहे. चिमूरला कोण विसरेल ? चिमूरहूनही भीषण अत्याचार रामनंद जिल्ह्यात झाले. कोण विसरेल त्या गोष्टी ? स्त्रिया निर्भय झाल्या होत्या. पोलीस झडतीला आले तर " बघ मेल्या घरात आहे का ? " म्हणत. शेकडो स्त्रिया तुरुंगात होत्या. लहान मुली मिरवणुका काढीत. मामलेदाराने अडवले तर म्हणत : " चले जाव. तुमची सत्ता संपली. " नाशिकला एक गोरा सार्जंट रस्त्यावरून जाऊ देत नव्हता. एक माळीण आली व "जारे टोपड्या" म्हणत निघून गेली. सार्जंट बघतच राहिला अणि समाजवादी पक्षाच्या त्या सवितादेवी! ४२ च्या चळवळीत तुरुंगात क्षयी झाल्या. सरकारने सोडले. परंतु देवाघरी गेल्या. श्रद्धानंदाच्या त्या कन्या. त्यांचा त्याग, ज्वलंत वाणी, कोण विसरेल ? असा हा देशभरचा इतिहास.

आणि तिकडे नेताजींच्या आझाद हिंद फौजेत मुली दाखल झाल्या. बंदुका घेऊन हिंडू लागल्या कॅप्टन लक्ष्मीचे नाव कोणाला माहीत नाही ? २६ तास बाँब-वर्षाव होत असता त्या जखमी शिपायांची शुश्रूषा करीत राहिल्या. नेताजींनी अद्‌भुत केले.

आज देश स्वतंत्र आहे. आणि देवी सरोजिनी संयुक्त प्रांताच्या गव्हर्नर झाल्या. विजयालक्ष्मी वकील म्हणून गेल्या. हंसा मेहता जागतिक हक्कांच्या सनदेसाठी विचारविनिमयार्थ गेल्या. मध्यप्रांतातील श्री. अनसूयाबाई काळे यांनी चिमूरबाबतीत केवढे कार्य केले ! सुचेता कृपलानी नौखालीच्या आगीत गेल्या नि भगिनींना सोडवित्या झाल्या. मद्रासकडच्या सुब्बालक्ष्मी कोणाला माहीत नाहीत ? कमलाबाई चट्टोपाध्याय तर जगप्रसिद्ध ! कोठवर नावे लिहायची ? आणि घटना समितीत चमकणाऱ्या चिरसेवक श्री. दुर्गाताई जोशी ! राजकीय दृष्टयाच स्त्रिया पुढे येऊ लागल्या असे नाही. तर सामाजिक सेवेतही पुढे येऊ लागल्या.

* * *

# साधना २ री आवृत्ती
ट्वेंटिएथ सेंचरि

स्टुडन्टस् **डिक्शनरी**

संपादक : प्रि. रा. प. सबनीस, एम. ए. (कॅन्टब)
प्रि. डॉ. ना. य. डोळे, एम.ए.पीएच्.डी.

पृष्ठे १४०     किंमत रु. ६.००

उपलब्ध असलेल्या इंग्रजी - इंग्रजी - मराठी शब्दकोशातील उणीवा दूर करून अधिक विस्तृत प्रमाणावर शब्द आणि अर्थ देणारा इंग्रजी शिक्षणाचा प्रारंभ करणाऱ्या विद्यार्थ्यांपासून पदवी परीक्षांपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या सर्व गरजा भागविणारा बृहद्कोश.

*कोशाची काही वैशिष्ट्ये*

१ ) आधुनिक इंग्लिश पद्धतीचे प्रमाणभूत उच्चार देवनागरी लिपीत.
२ ) साधित शब्दांची रचना कळण्याची मूळ शब्दांबरोबर सोय.
३ ) शब्दांचे व्याकरण.
४ ) अत्यंत उपयोगी अशी परिशिष्टे.

साधना प्रकाशन, शनवार, पुणे २